**रेग्यु. क्रि. केस नं. ६२/२०२२**

**निशाणी – २२**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक – ०२ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव –** भाऊसाहेब गणपती ढवळे

**वय** – ४७, **व्यवसाय**– शेती

**राहणार**– नेवरी, ता. कडेगांव जि. सांगली.

**सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री. ए.ए.सगरे तर्फे साक्षीदारचा सरतपास शपथेवर –**

१. दिनांक ०४/०४/२०२२ रोजी पोलीसांनी मला नेवरी दुरक्षेत्र येथे पंचनामा करायला बोलावले होते. तेथे वासंती ठोंबरे हजर होत्या. वासंती ठोंबरे यांनी लांब हाताचा डाव्या छातीवर फाटलेला लेडीज टॉप, कॉफी कलरचा तेथे हजर केला.त्या टॉपवर पुढील बाजुस पांढऱ्या रंगाची नक्षी व मागील बाजुस मेड इन इंडीया असे लिहले होते. पोलीसांनी तो टॉप जप्त केला. मला तो टॉप दाखविल्यास मी ओळखू शकतो.(साक्षीदारास जीएमआर नं.५३/२२ मधील टॉप दाखविला.) हा टॉप तोच आहे. पोलीसांनी टॉप जप्त करताना त्यावर लेबल लावून माझी सही घेतली. मला आता ते लेबल दाखविले. त्यावर माझी सही आहे. टॉपला **वस्तु अ** देण्यात येते. पोलीसांनी पंचनामा माझ्या समक्ष संगणकावर टाईप केला. त्याची प्रींट काढल्यानंतर तो वाचून मी त्यावर सही केली. मला आता पचंनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्याला **निशाणी २३** देण्यात येते. पंनाम्याला दुसरे पंच नवनाथ यमगर होते. पंचनामा १०.३० ते ११.५५ यावेळेत करणेत आला.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे वकिल श्रीमती डी.डी.जगताप यांचेतर्फे उलटतपास शपथेवर –</u>**

२. मला पंचनाम्याकरीता पवार हावलदार यांनी बोलावले. हे खरे नाही की, पंचनामा कशाचा होता ते मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, फिर्यादी माझ्या ओळखीच्या आहेत. हे खरे नाही की, मी फिर्यादीच्या घराशेजारी राहतो. मला घटनेबद्दल काहीही माहिती नाही. मी पंचनाम्याला बोलावल्यानंतर चालत नेवरी दुरक्षेत्र येथे गेलो. हे खरे नाही की, फिर्यादीचे पती माझ्या नात्यातील आहेत. हे खरे की, दुसरे पंच नवनाथ यमगर माझ्या माहितीचे आहेत. वस्तु अ सारखे टॉप बाजारात मिळत असतील. हे खरे नाही की, मी फिर्यादीच्या पतीसोबत पोलीस ठाणेत गेलो. फिर्यादीचे व आरोपीचे नाते काय आहे मला माहिती नाही. मी पंचनाम्याला सकाळी १०.१५ वाजता गेलो. हे खरे नाही की, हाताने लिहलेल्या पंचनाम्यावर मी सही केली. हे खरे नाही की, फिर्यादी व मी एकाच गावातील असलेने फिर्यादीला मदत म्हणून साक्ष देतो. हे खरे नाही की, पंचनामा झालेचे खोटे सांगतो. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो.

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. १५/०९/२०२३

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.